दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १७९ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार, दि.४ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
दौड्या डोंगर
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळीणा (दोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

शिवसेना मंत्र्यांचा अन्यायाविरुद्ध आवाज: सामाजिक न्याय खात्याचा निधी वळवला; शिंदे गटाची नाराजी उफाळली

लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय खात्याचा निधी वळवण्यात आल्याचा आरोप; संजय शिरसाट यांचा संतप्त सूर

मुंबई (वृत्तसंस्था):महायुती सरकारमध्ये सत्तेची भागीदारी असतानाही शिवसेनेच्या शिंदे गटातील नाराजीचं चित्र दिवसेंदिवस गडद होताना दिसत आहे. एकेकाळी 'अजित पवार आम्हाला निधी देत नाहीत' या कारणावरून मोठी बंडाळी करून शिवसेनेने वेगळा मार्ग स्वीकारला. अनेक आमदारांनीही त्याच कारणाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बंड पुकारलं. मात्र आज त्याच महायुतीत अजित पवार हे उपमुख्यमंत्री म्हणून सामील झाल्यानंतर, पुन्हा एकदा त्यांच्याच वागणुकीवरून शिंदे गट नाराजी व्यक्त करताना दिसत आहे.सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी 'लाडकी बहीण' योजनेसाठी आपल्या खात्याचा सुमारे सव्वा चारशे कोटी रुपयांचा निधी कोणतीही पूर्वकल्पना न देता वळवण्यात आल्याचा आरोप करत अजित पवारांवर थेट निशाणा साधला आहे. यावरून महायुतीतील अंतर्गत विसंवाद पुन्हा एकदा समोर आला आहे. 'सत्तेत असूनही आपल्याला दुय्यम वागणूक दिली जाते' असा सूर शिवसेनेच्या इतर नेत्यांच्या वक्तव्यांतूनही उमटत आहे. विशेष म्हणजे ज्याच्याविरोधात बंड करून सत्ता बदल घडवून आणली, त्या व्यक्तीच्या हाताखाली काम करताना शिवसेनेच्या मंत्र्यांना वारंवार तडजोडीच्या आणि अपमानाच्या प्रसंगाला सामोरे जावे लागत असल्याचे संकेत या घडामोडींमधून मिळत आहेत.ही परिस्थिती केवळ राजकीय विसंवाद नसून, महायुतीतील सत्तेसाठी चाललेल्या अंतर्गत संघर्षाचे स्पष्ट चित्रण करत आहे. त्यामुळे आगामी काळात या नाराजगटाच्या भूमिका, वक्तव्यं आणि त्यातून तयार होणारी अस्वस्थता महायुतीच्या स्थैर्यावर कितपत परिणाम करते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

अजित पवारांचा निधीला नकार–शिरसाट

२०२३ मध्ये संजय शिरसाट यांनीच माध्यमांशी बोलताना म्हटले होते की, मविआच्या काळात मी अजित पवार यांच्याकडे गेलो होतो तेव्हा त्यांनी मला स्पष्ट शब्दात तुम्ही आमच्या पक्षाचे नाहीत, त्यामुळे मी निधी देवू शकत नाही असे सांगतिले होते. तर अजित पवारांना निधी वाटपावरून अनेक पत्रे दिली आहेत. एका आमदाराची पन्नास पन्नास पत्रे तिथे असतील. ती ही तपासून पहावीत. त्यावर कारवाई झालेली नाही. तर उद्धव ठाकरे यांच्याकडे त्याबाबत व्यथा मांडल्या. मात्र त्यावरही कोणतेच आश्वासन ठाकरे यांच्याकडून न मिळाल्याचे शिरसाट यांनी म्हटले होते.

मंत्र्यांच्या संतापाला काही अर्थ उरतो का?–वडेट्टीवार

दरम्यान संजय शिरसाटस यांनी निधी वळवला म्हणून नाराजी व्यक्त केल्यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांनी ट्विट करत म्हटलंय की, लाडक्या बहिणींसाठी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील महिलांचा निधी वळवण्यात आला आहे. म्हणजे एका योजनेसाठी राज्यातील इतर गरजूंची परवड सुरू आहे. निधी पळवून झाल्यानंतर सामाजिक न्याय मंत्री आता निधी वळवून झाल्यावर राग व्यक्त करतात आपल्या खात्यात काय सुरू आहे हे सुद्धा मंत्री शिरसाठ यांना माहिती नाही. खात्याशी संबंधित मंत्र्यांच्या संमतीशिवाय निधी वळवला? निधी वळवून झाल्यावर सामाजिक न्याय मंत्र्यांच्या संतापाला काही अर्थ उरतो का? या सरकारचा कारभार प्रश्न उपस्थित करणारा आहे. सगळा दिखावा आहे,यांनी एक निर्णय घ्यायचा, दुसऱ्यांनी टीका करायची... आणि जनतेला भूलथापा द्यायच्या.

संजय शिरसाट म्हणाले की, लाडकी बहीण योजनेसाठी माझ्या खात्याचा निधी वळवला आहे. मी अनेकदा सांगितले आहे की असे करता येत नाही पण तरीही निधी वळवण्यात आला आहे. जवळपास सव्वा चारशे कोटी रुपये वर्ग करण्यात आले असून याची मला काहीच कल्पना नाही.

सहन करायला काही मर्यादा असते, यापेक्षाही जास्त करत असाल तर सर्वच निधी एकदाच कट करुण घ्या. सामजिक न्याय खात्याचा निधी तुम्हाला कायदेशीर रित्या वर्ग करता येत नाही, कट करता येत नाही.हे कायदेशीर नसेल आणि अर्थवाले जास्त डोकं चालवत असतील तर हे बरोबर नाही. आदिवासी खातं, सामजिक न्याय खातं कशासाठी आहे? इतर खात्यातून पैसे वर्ग करता येत नाही का? परंतू हे असं करतात. लाडकी बहीण योजनेला पैसे देणे गरजेचे आहे याची कल्पना मलाही आहे. पण तुम्ही यामध्ये जातीयवाद करू शकत नाही. तुम्ही असे म्हणू शकत नाही की सामाजिक न्यायचे पैसे काढले आणि ते दलित बहीणींना दिले असे म्हणता येत नाही.



अजितदादांनी शिवसेनेसोबत गद्दारी केली

शिवसेना नेते रामदास कदम म्हणाले होते की, अजित पवार यांच्यामुळेच शिवसेनेचे आमदार फुटले. राष्ट्रवादीच्या आमदारांना जास्त निधी वाटप करून अजित पवार यांनी शिवसेनेसोबत गद्दारी केली.

श्रीकांत शिंदेंकडून निधी न मिळाल्याचा उल्लेख

एकनाथ शिंदे यांचे पूत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी आम्ही महाराष्ट्रभर फिरत असताना स्थानिक आमदार राष्ट्रवादीचे मंत्री निधी देत नाही, अशी तक्रार करतात, पहिले आम्ही विरोधात होतो तेव्हा बोलता येत होते पण आता सत्तेत असल्याने बोलता येत नाही असे म्हटले होते.

अजित पवारांकडून निधी वाटपात भेदभाव

आमदार महेश शिंदे म्हणाले होते की, शिवसेनेच्या आमदारांना ५० ते ६० कोटीची निधी आणि राष्ट्रवादीच्या आमदारांना ७०० ते ८०० कोटींचा निधी दिला जात होता, अजित पवारांनी निधी वाटपामध्ये भेदभाव केला असे त्यांनी म्हटले होते.

वासाडे यांच्या व्यंकटेश गिट्टी खदानीमुळे नागरिक त्रस्त

शिवसेना नेते मुकेश जिवतोडे यांनी तहसीलदारांना दिले निवेदन

वरोरा । प्रतिनिधी

पाझुर्णी येथील व्यंकटेश गिट्टी खदानीमधून सुरू असलेल्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे नागरिकांचे जीवनमान ढासळले असून, याविरोधात शिवसेना पक्षाचे लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांनी तहसीलदार वरोरा यांना तातडीने कारवाईसाठी निवेदन दिले आहे.



या निवेदनात त्यांनी सांगितले की, खदानीमधून होणाऱ्या ओव्हरलोड वाहन वाहतुकीमुळे पाझुर्णी ते आशी रस्ता पूर्णपणे खराब झाला असून, अपघातांची संख्या वाढली आहे. शेतकऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या शिवपांदन रस्त्यावरूनही ही वाहतूक होत असल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.विशेष म्हणजे, परवानगी न घेता शिवपांदन रस्ता रुंद करण्यात आला असून, झाडांची बेकायदेशीर तोड केली गेली आहे. याशिवाय खदानीवर काम करणारे परप्रांतीय वाहनचालक शेतकऱ्यांना धमकावत असून, गावकऱ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, असा गंभीर आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.त्यामुळे खदानीवर तातडीने कारवाई करावी,ओव्हरलोड वाहतूक थांबवावी ,रस्त्यांची दुरुस्ती करावी,अवजड वाहतुक बंद करावी व शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा करावा तसेच झाडतोड प्रकरणी वनविभागाणे चौकशी करून गुन्हा दाखल करावा आणि धमकी देणाऱ्या वाहनचालकांवर पोलिस कारवाई करावी व या प्रकरणाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे व जनतेच्या सुरक्षेसाठी कठोर पावले उचलावीत, अशी मागणीही जिवतोडे यांनी यावेळी केली आहे.यावेळी बंडू डाखरे, माजी नगरसेवक दिनेश यादव, सरपंच जयमाला भोयर, किशोर खडसे, विकास भोंग, रामाजी खडसे, बंडू बोधाने, लक्ष्मण भोयर,किसान भोयर,शंकर खडसे, मारोती घुगरे,अमोल नांदे,विठ्ठल मस्की,ऋषभ मस्की,सुरेश भोयर, सोपान ठावरी,भारत नांदे, भानुदास खडसे,नानाजी खडसे,भानुदास भोंग, प्रणित भोयर,अमित खडसे आदी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांच्या हस्ते मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे उद्घाटन

चंद्रपूर । प्रतिनिधी

प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या माळ्यावर स्थापन करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाचे राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते आज (दि.१) उद्घाटन करण्यात आले.

यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार किशोर जोरगेवार, आमदार सुधाकर अडबाले, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग यांच्यासह कक्ष प्रमुख कथा वैद्यकीय अधिकारी डॉ. कविश्वरी कुंभलकर, समाजसेवा अधीक्षक भास्कर शेळके, वरिष्ठ लिपिक दीपक शेळके आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष स्थानिक स्तरावर स्थापन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व रुग्णांना या कक्षाची माहिती झाली पाहिजे. गरीब रुग्णांना मुंबईला यासाठी चकरा मारा लागू नये म्हणून, स्थानिक पातळीवरच



मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून उपचाराची सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या माळ्यावर हा कक्ष उभारण्यात आला असून जनतेमध्ये याची जास्तीत जास्त जनजागृती करावी, असे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी सांगितले.मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष स्थापनेचा उद्देश : समाजातील गरीब गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मदाय रुग्णालय अंतर्गत उपचार मिळवून देणे, महात्मा ज्योतिबा फुले /आयुष्यमान भारत योजना तसेच इतर जनआरोग्य योजनांची माहिती रुग्णांना देणे व त्यांना संदर्भित करणे, आरोग्य संबंधित योजनेमध्ये समाविष्ट होऊ न शकणा–या रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मदत करणे होय असे कक्ष प्रमुख डॉ. कविश्वरी कुंभलकर यांनी कळविले आहे.

दारूबंदीची गर्जना: अवैध दारूविक्रीविरोधात महिलांचा एल्गार!

साक्री तालुक्यातील लगळवाड व शिवाजी नगर गावांतील महिलांचा मोर्चा दहिवेल पोलीस दुरक्षेत्रावर

धुळे । उमाकांत अहिरराव

साक्री तालुक्यातील लगळवाड व शिवाजी नगर या ग्रामपंचायत क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सर्रासपणे अवैध दारू विक्री सुरू आहे. या अवैध धंद्यांमुळे अनेक तरुण अंमली पदार्थांच्या आहारी जात असून, कुटुंबांचे प्रचंड हाल होत आहेत. यामुळे संतप्त झालेल्या महिलांनी शुक्रवारी (ता. २ मे) एकत्र येत गावातुन मोर्चा काढून थेट दहिवेल पोलीस दुरक्षेत्रात जाऊन निवेदन सादर केले.

गावकऱ्यांनी १ मे रोजी गावसभेत एकमताने अवैध दारूधंद्याविरोधात ठाम भूमिका घेतली होती. त्यानुसार महिलांच्या नेतृत्वाखाली बचत गटांच्या सदस्यांसह



गावातील शेकडो महिला रस्त्यावर उतरल्या. त्यांनी गावातील व परिसरातील अवैध दारूविक्री, अंमली पदार्थांचे व्यवहार आणि इतर अवैध धंदे तात्काळ बंद करण्याची जोरदार मागणी केली.

महिलांनी पोलीस अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गावातील अनेक पुरुष दारूच्या व्यसनामुळे कुटुंबावर अत्याचार करतात, किरकोळ कारणावरून भांडण आणि मारहाणीच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे महिलांचे मानसिक आणि शारीरिक जीवन अस्थिर झाले आहे. लहान मुलेही वाईट मार्गाला लागत असून, संपूर्ण समाजरचनेवर विपरीत परिणाम होत आहे.

गावात दारूबंदी केली नाही, तर पुढील वेळी आम्ही जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या दारात जाऊन आंदोलन करू, असा इशाराही महिलांनी यावेळी दिला. या मोर्चात गावकरी, महिला, युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

विसावा नाका परिसरात गोंधळ

दोघांविरुद्ध शांतता भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

सातारा शहर पोलीस ठाण्यात हवालदार इरफान मुलाणी यांच्या फिर्यादीवरून कारवाई

सातारा । किरण अडागळे

शहरातील विसावा नाका परिसरात एका हॉटेलसमोर सार्वजनिक रस्त्यावर गोंधळ घालून शांतता भंग केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी अमन रफीक मणेरी व निलेश देशमुख (दोघेही रा. विसावा नाका) यांनी काल रात्री सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्याने ओरडून, एकमेकांना शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यामुळे परिसरात तणाव निर्माण होऊन सार्वजनिक शांतता भंग झाली, अशी माहिती हवालदार इरफान मुलाणी यांनी दिली. त्यांनीच याबाबत पोलीस ठाण्यात



तक्रार दाखल केली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास हवालदार घोडके करत आहेत.

उल्हासनगरात तीव्र पाणी टंचाई; शिवसेना उबठाचे पालिकेच्या प्रवेशद्वारावर आंदोलन

पालिका प्रशासनाचे वारंवार लक्ष्य वेधूनही कोणताही ठोस कारवाई नाही

पालिका सुरक्षारक्षक, पोलिस आणि आंदोलकांमध्ये धक्काबुक्की

ठाणे । प्रतिनिधी

उल्हासनगर शहरातील नागरिक गेल्या अनेक महिन्यांपासून विविध नागरी समस्या सहन करत आहेत. यामध्ये विशेषतः पाणीटंचाई,पाणीपुरवठ्याची अनियमितता, वाढलेले पाणी दर, रस्त्यांचे अत्यंत खराब व अपूर्ण स्थितीतले काम, आणि प्रदूषित पाण्यामुळे उद्भवणाऱ्या आजारांचा धोका या गंभीर समस्या समाविष्ट आहेत. यामुळे नागरिकांचे आरोग्य आणि आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे. पिण्याचे पाणी पिवळसर आणि दुर्गंधीयुक्त असून कावीळ, मलेरिया यांसारख्या आजारांना नागरिक बळी पडत आहेत. दुसरीकडे, अनेक ठिकाणी रस्ते खोदून तसेच सोडले गेले असून त्यामुळं अपघात होण्याचं प्रमाणही वाढलं आहे.या सर्व समस्यांकडे पालिका प्रशासनाने वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जन आक्रोश आंदोलन पवित्र हाती घेतला असून शुक्रवारी



उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर धरणे आंदोलन तसेच प्रशासनाला जाग आणण्यासाठी होम हवन केला आहे

विशेषतः उन्हाच्या तीव्र झळा सुरू झाले आहे त्यात उल्हासनगरातील नागरिकांना पाण्यासाठी भीषण संघर्ष करावा लागत आहे गेल्या अनेक दिवसापासून नळ कोरडे पडले आहेत त्यामुळे लोकांना थेंबा थेंबासाठी झगडावे लागत आहे प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांना त्रस्त असून त्यांनी संतप्त प्रतिक्रिया देत आंदोलन केला आहे नळांना पाणी येत नसल्याने नागरिकांचे हाल सुरू आहेत महिला,लहान मुले,वृद्ध,आजारी व्यक्तींना विशेषतः मोठा त्रास सहन करावा लागत आहे बोरींच्या पाण्यावर तहान भागविण्याची वेळ आली आहे

होते काही शिवसैनिक आत मध्ये आले त्यानंतर शिवसैनिक पोलीस महापालिकेचे सुरक्षारक्षक यांच्यामध्ये धक्काबुक्की झाली. त्यामुळे महापालिकेच्या परिसरात तणावाचे वातावरण पसरले. उल्हासनगर शहरांमध्ये पाणीटंचाई त्याचबरोबर अनियमित पाणीपुरवठा होत असल्याच्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाने महापालिकेवर मोर्चा काढला आला

यावेळी शिवसेनेचे उंबाठाचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झालेले पाहायला मिळाले. त्यामुळे महापालिकेच्या प्रवेशद्वाराचा गेट सुरक्षा रक्षक आणि बंद केला आणि त्यामुळे शिवसैनिक चांगले संतापले मग त्यांनी गेटवर चढून महापालिकेत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला यावेळी सगळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली उल्हासनगर परिसरात पाच सहा दिवस पाणी नाही अधिकाऱ्यांना फोन केला तर अधिकारी फोन उचलत नाही व वारंवार या समस्याकडे पालिका अधिकारी दुर्लक्ष्य करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

उपजिल्हा रुग्णालयातील शवगृहात कोल्ड कॅथनिट बसवावेत-आमदार पाटील यांच्याकडे मागणी

फारुक जमादार, सदस्य-रुग्ण कल्याण समिती,उपजिल्हा रुग्णालय करमाळा

सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा येथील उपजिल्हा रुग्णालयातील शवगृहात कोल्ड कॅथनिट बंद असून, नवीन दोन कोल्ड कॅथनिट बसवण्यासाठी शासनाकडून निधी मिळावा, अशी मागणी आमदार नारायण आबा पाटील यांच्याकडे करण्यात आली. रुग्ण कल्याण समितीचे सदस्य फारुक जमादार यांनी याबाबत निवेदन सादर केले.



यावेळी तहसीलदार शिल्पा ठोकडे, माजी नगरसेवक किरण बोकन, नरेंद्र ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते मुस्तकीन पठाण, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सोहेल पठाण, राजेंद्र वीर आदी उपस्थित होते.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या शवगृहातील कोल्ड कॅथनिट बंद असल्याने अज्ञात वा अपघातग्रस्त मृतदेह ओळख पटेपर्यंत तीन दिवस शवविच्छेदन कक्षात ठेवावे लागतात. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरते आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे शवगृहात तातडीने दोन कोल्ड कॅथनिट बसवून सुविधा उपलब्ध करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आनंद निकेतन महाविद्यालयाला क्रीडा क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरीसाठी १ लाख रुपयांचे पारितोषिक

वरोरा । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांच्या वतीने २०२३-२४ मध्ये झालेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये आनंद निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत एक लाख रुपयांच्या पारितोषिकाचा मान मिळवला आहे.



१९ वर्षांखालील मुले आणि मुलींच्या गटात महाविद्यालयाच्या ६० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी विविध क्रीडाप्रकारांमध्ये सहभाग घेत प्रावीण्य प्राप्त केले. यामुळे महाविद्यालयाला या स्पर्धांमध्ये सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरवण्यात आले. हा बहुमान संस्थेला प्रथमच प्राप्त झाला आहे.महाराष्ट्र राज्याच्या ६५व्या वर्धापन दिनी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. राधा सवाने यांना एक लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.या उल्लेखनीय यशाबद्दल महारोगी सेवा समिती वरोरा चे सचिव डॉ. विकास आमटे, विश्वस्त कौस्तुभ आमटे, अंतर्गत व्यवस्थापक पल्लवी आमटे, विश्वस्त सुधाकर कडू, डॉ. विजय पोळ, सदाशिव ताजणे, माधव कवीश्वर यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे, उपप्राचार्य प्रा. राधा सवाने, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. तानाजी बायस्कर व सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेचे घवघवीत यश

आलीना शेख जिल्ह्यात प्रथम, राज्यात तेराव्या क्रमांकावर

सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा येथील कै. नामदेवराव जगताप नगरपरिषद उर्दू शाळेने महाराष्ट्र दिनाच्या दिवशी शैक्षणिक क्षेत्रात मोठा ठसा उमटवला. ऋद्धड राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत शाळेच्या आलीना इलियास शेख हिने सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून राज्यात तेरावा क्रमांक मिळवला. तर बरीरा सादिक शेख हिला जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळाला.

या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर भाई शेख यांच्या हस्ते विजयी विद्यार्थिनींचा ट्रॉफी व पदक देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात बोलताना मौलाना मोहसीन शेख यांनी शाळेच्या सततच्या प्रगतीचे कौतुक केले. शाळेचा निकाल दरवर्षी चढता आहे आणि यामागे मुख्याध्यापक व शिक्षकांचा खूप मोठा वाटा आहे, असे ते म्हणाले.या वेळी शाळेचे मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर, मौलाना सिकंदर, हाफीज अन्वर, शकुर शेख, अजहर शेख, आनिस कुरेशी, हाजी ख्वाजा हुसेन कुरेशी, हाफीज कादर, मुजावर सर, राजू नालबंद, मजहर पठाण, इम्रान शेख, इस्माईल सय्यद, इकबाल शेख आदी मान्यवर उपस्थित होते.यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, शिवदास कोकाटे आणि मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांनी अभिनंदन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांना निगार मुंडेवाडी यांचे मार्गदर्शन लाभले.



सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री मदत कक्ष' कार्यान्वित

गरजूंना तातडीने मदत मिळण्यासाठी सुविधा; महाराष्ट्र दिनी उद्घाटन

सातारा । किरण अडागळे

मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून गरजूंना तातडीने आर्थिक मदत मिळावी, तसेच नातेवाईकांना मंत्रालयात हेलपाटे मारण्याची वेळ येऊ नये, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री मदत कक्ष' सुरू करण्यात आला आहे.



महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून या कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मदतीसाठी स्थानिक स्तरावरच त्वरित मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

देशाच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी कामगारांचे हित अत्यंत आवश्यक-चोखारे

महाराष्ट्र दिनानिमित्य ताडाळी एम.आय.डी.सी. स्पंज आर्यन कामगार संघटनेतर्फे शरबत वाटप

चंद्रपूर । प्रतिनिधी

देशाच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी कामगारांचे हित अत्यंत आवश्यक आहे. कामगार देशाची आर्थिक आणि सामाजिक प्रगती करतात, त्यामुळे त्यांच्या हिताचे संरक्षण करणे हे देशाच्या हितासाठी आवश्यक असल्याचे मत ताडाळी एम. आय. डी. सी. स्पंज आर्यन कामगार संघटनेचे अध्यक्ष, कामगार नेते तथा काँग्रेसचे नेते दिनेश दादापाटील चोखारे व्यक्त केले.



महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन निमित्य ताडाळी एम. आय. डी. सी. स्पंज आर्यन कामगार संघटनेतर्फे नागपूर मुख्य मार्गावरील टी पॉईंट एमआयडीसीजवळ मान्यवरांचे उपस्थित शरबत वाटप करण्यात आहे. यावेळी गोपानी कंपनीचे उपाध्यक्ष अमोल चंद्र उदोजी, गोपानी कंपनीचे विभाग प्रमुख संतोष लाल, कामगार संघटनेचे महासचिव संतोष बांदूरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी नागपूर मार्गावरून प्रवेश करणाऱ्यांना शरबत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी ताडाळी एम. आय. डी. सी. स्पंज आर्यन कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष तुळशीराम डेरकर, उपाध्यक्ष मोहन वाघमारे, कोषाध्यक्ष सदाशिव चतुर, संघटनेचे सदस्य दशरथ रोगे, रमेश आरपेल्ली, विकास आवारी, सागर कन्नीरवार, संतोष खोब्रागडे, विजय मोरे, महेश जुनघरे, नंदू टोंगे आदींनी अथक परिश्रम घेतले.

लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी रुपचंद धारणे



भद्रावती । प्रतिनिधी

स्थानिक लोकसेवा मंडळातर्फे संचालित लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे रुपचंद धारणे यांची व्यवस्थापन मंडळाने प्राचार्यपदी नुकतीच नियुक्ती केली. श्री धारणे यांनी आपला पदभार स्वीकारला आहे. लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन सरपटवार हे नियत वयोमानानुसार दि.३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी उपप्राचार्य रुपचंद धारणे यांना नियुक्त करण्यात आले. तर पर्यवेक्षक प्रफुल्ल वटे यांची उपप्राचार्य पदावर नियुक्ती करण्यात आली. तसेच पर्यवेक्षक पदावर ज्येष्ठ शिक्षक रमेश आसेकर यांची नियुक्ती करण्यात आली. लोकसेवा मंडळाच्या कार्यालयात एका छोटेखानी समारंभात मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत गुंडावार यांनी या तिन्ही अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची घोषणा करत त्यांचे पुष्पगुच्छ देऊन व पेढा भरवून अभिनंदन केले व त्यांना त्यांच्या भावी कारकिर्दीकरिता शुभेच्छा दिल्या. त्यानंतर या तिन्ही अधिकाऱ्यांनी आपापल्या पदाची सुत्रे स्वीकारली. यावेळी व्यवस्थापन मंडळाचे आभार मानत या तिन्ही अधिकाऱ्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने संस्थेच्या प्रगतीसाठी प्रयत्न करण्याची ग्वाही आपल्या मनोगतातून दिली. यावेळी लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत गुंडावार, सहसचिव अमित गुंडावार, मंडळाचे संचालक गोपाळ ठेंगणे, उमाकांत गुंडावार, अविनाश पाम्पट्टीवार, संजय पारधे, माजी प्राचार्य सचिन सरपटवार, लोकमान्य ज्ञानपीठाच्या प्राचार्या पूनम ठावरी आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा.नितीन लांजेवार यांनी केले.तर आभार शिक्षक विशाल गावंडे यांनी मानले.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शेलगाव वांगी येथे कँडल मार्च

शहीद नागरिकांना श्रद्धांजली; नागरिकांचा भावनिक सहभाग अपेक्षित

सोलापूर । प्रतिनिधी

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शेलगाव वांगी येथे रविवारी (दि. ४ मे) सायंकाळी ७ वाजता कँडल मार्चचे आयोजन करण्यात आले आहे. या हल्ल्यात शहीद झालेल्या निरपराध नागरिकांप्रती श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हा मार्च काढण्यात येत असून परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व संताप व्यक्त होत आहे.

शेलगाव चौक वांगी येथे होणाऱ्या या मार्चमध्ये शिवसेना व भाजपचे पदाधिकारी तसेच सर्व देशभक्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला शिवसेनेचे नेते दिग्विजय बागल आणि भाजपच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी दीदी बागल प्रमुख उपस्थित राहणार आहेत.



या कँडल मार्चद्वारे देशाच्या एकतेचा संदेश देत शहीदांना मानवंदना देण्यात येणार आहे. उपस्थित नागरिकांनी मेणबत्त्या, दिवे आणि श्रद्धांजली संदेश घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जळगावमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अत्याधुनिक टीएमआरआय मशीनचे उद्घाटन

पालकमंत्री गुलाबराव पाटील व जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न

जळगाव । प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या ईएसआयएस (एड्खउ) योजनेअंतर्गत जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात अत्याधुनिक श्री टीएमआरआय (ढचठख) मशीन कार्यान्वित करण्यात आले आहे. या आधुनिक तपासणी यंत्रणेमुळे जिल्ह्यातील रुग्णांना अचूक निदानाची सुविधा मिळणार असून, उपचार प्रक्रियाही अधिक प्रभावी होणार आहे.या यंत्रणेचे उद्घाटन राज्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जलसंपदामंत्री गिरीश महाजन होते. या उद्घाटन सोहळ्यात विविध मान्यवरांनी आपली उपस्थिती नोंदवली.



या वेळी खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोंडे, वैद्यकीय शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. माहेश्वर रेड्डी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांच्यासह वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, जिल्ह्यातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, अशा अत्याधुनिक यंत्रणेच्या स्थापनेमुळे ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना दिलासा मिळेल. जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनीही रुग्णसेवेतील तांत्रिक प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले आणि वैद्यकीय शिक्षण व संशोधनात अशा सुविधा कशा उपयुक्त ठरतात यावर भर दिला. टीएमआरआय मशीनच्या स्थापनेमुळे कर्करोग, मेंदूविकार, हृदयविकार आदी गंभीर आजारांचे लवकर निदान शक्य होईल. यामुळे रुग्णांचे जीव वाचवणे आणि उपचाराचा दर्जा उंचावणे शक्य होणार आहे.ही सुविधा रुग्णांसाठी नक्कीच मैलाचा दगड ठरेल, असे उपस्थितांनी नमूद केले.

मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धा-टप्पा २ (२०२४-२५)

देवळी तालुक्यात प्रथम क्रमांक जि.प.उच्च प्राथमिक शाळा,कांदेगाव पुरस्कार-३ लाख

कांदेगाव । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेच्या टप्पा २ (२०२४-२५) मध्ये जि.प. उच्च प्राथमिक शाळा, कांदेगाव यांनी सातत्यपूर्ण नवोपक्रम व गुणवत्तापूर्ण कार्याच्या आधारावर देवळी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. एकेकाळी अती दुर्गम व दळणवळणाच्या दृष्टिकोनातून मागास मानली जाणारी ही शाळा आज तालुक्यात अग्रगण्य स्थानावर पोहोचली आहे.



गेल्या पाच वर्षांत शिक्षकांनी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत शाळेला नवे स्वरूप प्राप्त करून दिले. शैक्षणिक सहल, 'कल्पतरू' विद्यार्थी बचत बँक, विद्यार्थी वाचनालय, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांतील घवघवीत यश अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता व सामाजिक सहभाग वाढला. यामध्ये शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांचे मोलाचे योगदान लाभले.या यशामागे शिक्षक शरद भांगे, सौ. सुनिता वाके, प्रशांत निंभोरकर, दयाल ठमके तसेच मुख्याध्यापक राजेंद्र गणवीर यांचे प्रयत्न विशेषत्वाने उल्लेखनीय आहेत. या स्पर्धेअंतर्गत शाळेला ३ लाख रोख रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

पुरस्कार वितरण समारंभास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मान. सुमेध शापामोहन, सरपंच मान. प्रदीप हेंडवे, पोलिस पाटील मान. संजय पचारे, तसेच माजी समिती अध्यक्ष मान. सुधाकर अराडे उपस्थित होते.

या प्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी मान. राजेश रेवतकर, केंद्रप्रमुख मान. अमोल नागरगोजे, व बैस सर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

विशेष उल्लेखनीय बाब: राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गासाठी विषय 'भाषा' अंतर्गत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मुख्याध्यापक राजेंद्र गणवीर यांना प्राप्त झाले. त्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन मनिष जगताप यांनी केले. शाळेच्या या अभूतपूर्व यशामुळे तालुक्यात व जिल्ह्यातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धा

खाजगी गटात सृजन कॉन्व्हेंट देवळी यांचा द्वितीय क्रमांक

देवळी । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेमध्ये खाजगी व्यवस्थापन गटात सृजन कॉन्व्हेंट, देवळी या शाळेने उल्लेखनीय कामगिरी करत तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला आहे.दिनांक २ मे २०२५ रोजी गट संसाधन केंद्र, देवळी येथे पार पडलेल्या पारितोषिक वितरण समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप २ लाख रोख रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे होते.गटशिक्षणाधिकारी राजेश रेवतकर, विस्तार अधिकारी मुन , केंद्रप्रमुख नागरगोजे, मनीष जगताप आणि बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत सृजन कॉन्व्हेंटच्या शाळेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



या वेळी शाळेच्या वतीने संस्था अध्यक्षा डॉ.श्रद्धा चोरे, मुख्याध्यापिका प्रिया वैद्य, मनोज बकाने, मयूर तेलरांधे, मयूर राऊत तसेच विद्यार्थिनी उपस्थित होत्या.शाळेच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ.श्रद्धा चोरे आणि सचिव डॉ. प्रशांत चव्हाण यांनी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले.

शिवसेना वर्धा जिल्हा समन्वयकपदी अनिल देवतारे यांची नियुक्ती



सेलू । प्रतिनिधी

वर्धा येथील शासकीय विश्रामगृहावर पक्षबांधणी संदर्भातील आयोजित बैठकीत अनिल देवतारे यांची शिवसेना वर्धा जिल्हा समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे.या बैठकीत पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव व वर्धा जिल्हा निरीक्षक संदीप बर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख राजू सराफ, गणेश इखार, महिला आघाडी जिल्हा प्रमुख शुभांगी ठमेकर, सेलू नगरपंचायत नगराध्यक्ष स्नेहल देवतारे, तालुका प्रमुख रोशन कोंबे, शहर प्रमुख प्रशांत झाडे, रोशन राऊत, तसेच जिल्ह्यातील उपजिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, युवा सेना जिल्हा प्रमुख व अनेक माजी व विद्यमान पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्धा विभागातील हिंगणघाट बस आगाराच्या ताफ्यात ५ नवीन बसेस दाखल

आ.समीर कुणावार यांच्या विशेष प्रयत्नांना यश! लवकरच आणखी ५ बसेसची ग्वाही

हिंगणघाट । अनुकूल कोचर

वर्धा परिवहन महामंडळाच्या हिंगणघाट आगारात आज ५ नवीन अशोक लेलँड कंपनीच्या अत्याधुनिक सुविधायुक्त बसेस दाखल झाल्या. या बसेसचा लोकार्पण सोहळा हिंगणघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते फित कापून व हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

या प्रसंगी आमदार कुणावार यांनी प्रवासी, चालक व वाहकांच्या समस्यांविषयी सातत्याने प्रयत्नशील राहून उपाययोजना राबविल्या जातील, अशी ग्वाही दिली. तसेच हिंगणघाट आगारातील बसेसची योग्य देखभाल करण्याच्या सूचना त्यांनी आगार व्यवस्थापकांना दिल्या.भविष्यात आणखी ५ बसेसची मागणी परिवहनमंत्री यांच्याकडे करण्यात आली असून, काही महिन्यांत त्यांचीही उपलब्धता होणार असल्याचे आमदारांनी सांगितले. तसेच हिंगणघाट बस स्थानकाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर झाल्याची माहिती त्यांनी दिली. यामधून १५ फलाट व नविन देखणे बस स्थानक उभारण्याचे कार्य लवकरच सुरु होणार आहे.या कार्यक्रमाला प्रतापसिंह राठोड (विभाग नियंत्रक, रा.प.वर्धा), भाजप नेते किशोर दिघे,आकाश पोहाणे,संजय डेहणे,भूषण पिसे, तसेच हिंगणघाट आगारातील चालक-वाहक, पत्रकार, प्रवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत आराध्या घोडमारे हिने मारली बाजी

सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी

येथील गुंज कॉन्व्हेंट स्कूलच्या इयत्ता ५ वीच्या विद्यार्थिनी आराध्या निलेश घोडमारे हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.




या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून आराध्याने ६०.४० टक्के गुण प्राप्त करून आपल्या ज्ञानाची आणि तयारीची प्रचिती दिली आहे. तिच्या या यशामुळे सर्व स्तरांवरून कौतुक होत असून गुंज कॉन्व्हेंट स्कूलचे प्राचार्य व शिक्षकवृंद यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.तिच्या यशामागे शाळेच्या शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ महत्त्वाचे ठरले. शिक्षकांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे आराध्याला हे यश मिळवता आले, असे तिचे पालक निलेश व घोडमारे यांनी यावेळी सांगितले.

अप्पर तहसील कार्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

पुलगाव । प्रतिनिधी

अप्पर तहसील कार्यालयात महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवार, १ मे रोजी सकाळी ८ वाजता आयोजित कार्यक्रमात अप्पर तहसीलदार स्नेहा क्षिरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रसंगी नायब तहसीलदार अजय झिले तसेच विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर अप्पर तहसीलदार स्नेहा क्षिरसागर यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व विषद करत सर्वांना संबोधित केले.कार्यक्रमावेळी एन.के. मानकर, चंद्रशेखर कोल्हे, पटवारी भारत डेहनकर, एस.आर. चनूरवार, अक्षय रघूंवशी, उषा मरापे, प्रफुल्ल बरडे, मनोहर हांडे, सत्यजित भर्मे, केशव कोल्हे, प्रकाश घांगळे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रम सुशोभित व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.



विकासाची गंगा जनसामान्यापर्यंत पोहोचण्या साठी जातीय जनगणना आवश्यक-संजय गाते

पुलगाव । प्रतिनिधी

सरकारच्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, यासाठी समाजाच्या सामाजिक स्थितीची अचूक माहिती असणे आवश्यक आहे. १९३१ नंतर आजतागायत जातीनिहाय जनगणना झालेली नसल्यामुळे योजनांची अंमलबजावणी अपुरी राहिली. त्यामुळे मोदी सरकारने घेतलेला जातीनिहाय जनगणनेचा निर्णय ऐतिहासिक असून, तो विकासाची गंगा सामान्यांपर्यंत पोहोचवणारा ठरेल, असे प्रतिपादन भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी केले. पुलगाव येथे ३ मे रोजी टिळक चौकात आयोजित जल्लोष कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी मोदी सरकारच्या निर्णयाबद्दल धन्यवाद देणाऱ्या घोषणा देण्यात आल्या व लाडूंचे वाटप करून जल्लोष साजरा करण्यात आला.



संजय गाते पुढे म्हणाले, जातीनिहाय जनगणना म्हणजे भारतातील लोकसंख्येची जात व सामाजिक-आर्थिक स्थितीच्या आधारे नोंद. ब्रिटिश कालावधीत १८७२ ते १९३१ दरम्यान सातत्याने अशा जनगणना झाल्या. मात्र, १९५१ नंतर स्वतंत्र भारतात फक्त अनुसूचित जाती व जमाती यांचीच गणना सुरू राहिली. २०११ मध्ये झालेली सामाजिक-आर्थिक व जात जनगणना (डएउउ) ही आकडेवारी अद्यापही सार्वजनिक झालेली नाही.

नवीन जातीय जनगणनेमुळे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग ओळखता येतील, योजनांची गरज आणि व्याप्ती निश्चित करता येईल. त्यामुळे आरक्षण धोरण अधिक पारदर्शक व प्रभावी होईल. सामाजिक न्यायाच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे, असेही ते म्हणाले.काँग्रेस सरकारने २०११ च्या जातीय आकडेवारीला दडपल्यामुळे सामान्यांचा विकास रखडला. आता मोदी सरकारने घेतलेला निर्णय जनतेला न्याय देणारा आहे, असे गाते यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमात भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, शहराध्यक्ष प्रशांत इंगोले, माजी अध्यक्ष नितीन बडगे, जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, ज्येष्ठ नेते कपिल शुक्ला, सुरेश सुखिजा, उत्तर भारतीय आघाडी जिल्हाध्यक्ष संदीप ठाकूर, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस माधुरी इंगळे, शहर अध्यक्षा रिता येटीवार, युवा मोर्चा अध्यक्ष अली असगर सैफी, अनिल लेकुरवाळे, राजकुमार पनपालिया, मनोज वाल्दे, सूरज सुरस्कार, गुंजन चव्हाण, राजेश गुप्ता, अरविंद भार्गव,सोनल दुबे,प्रीती सावसाकडे, निलेश खापरडे, ज्ञानेश्वर कुंभारे, सुमित शहाडे, गणेश पाटणे, महेश मार्कड, प्रफुल मंथनवार, विजय ढगे, शैलजा जांभूळकर, आतिष वर्मा, राजूभाऊ इंगळे, चंदू बेले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

प्रशासन-जनता सुसंवादातूनच होईल सुशासनाची वाटचाल-आ.मुनगंटीवार

खैरगाव (जि.चंद्रपूर) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे उद्घाटन



चंद्रपूर । प्रतिनिधी

जनतेपर्यंत योजना पोहोचवणे ही केवळ जबाबदारी नाही, तर आपले आद्यकर्तव्य आहे. आपण शिवरायांच्या लोककल्याणकारी विचारांचे खरेखुरे वाहक आहोत. त्यामुळे प्रशासन आणि जनतेमधील दरी मिटविणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून सुशाशनाचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणे शक्य आहे, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

विचोडा व चांदसुर्ला गट ग्रामपंचायतच्यावतीने खैरगाव (जि. चंद्रपूर) येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे उद्घाटन आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, नायब तहसीलदार जितेंद्र गादेवार, भाजप महानगर महामंत्री रामपाल सिंह, अनिल डोंगरे, विचोडाच्या सरपंच माधुरी सागोरे, हनुमान काकडे, ग्रामपंचायत सदस्य संगीता हेलवडे, मुख्याध्यापक खैरकर, शिक्षक शेंडे यांच्यासह सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, विचोडा व चांदसुर्ला येथील ग्रामपंचायत सदस्य व नागरिकांची उपस्थिती होती.महाराजस्व अभियानाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आहे. ज्यांनी सिंहासनावर नव्हे तर रयतेवर प्रेम केले. माझे राज्य हे रयतेचे राज्य आहे, अशी भूमिका मांडली. त्यांच्या नावाने रयतेच्या विकासाचे कार्य सुरू आहे, याचा अभिमान आहे, अशी भावनाही आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. सर्वसामान्य, दिन-दुबळे, वंचितांचे प्रश्न मांडण्याची संधी मला मिळत आहे. जनतेला न्याय मिळवून देणे, लोकांचे प्रश्न सोडविणे यासाठी संसदीय आयुधांचा सातत्याने वापर करत आलोय. आज तर आपल्या सरकारचे काम वाघाच्या गती पेक्षा जास्त गतीने सुरू आहे. लाडकी बहीण योजना असो, सातबारा किंवा रेशन कार्ड देण्याचे काम असो. सरकार प्रत्येक टप्प्यावर गतीने काम करत आहे, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.स्वातंत्र्यानंतर एका वर्षात एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांना कधीच घरकुले मिळाली नाहीत. सर्वांना घरकुले देण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. लवकरच घरकुल योजनेत पाच ब्रास मोफत रेती मिळणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. कोळसा खाणीमुळे चंद्रपूरमध्ये खूप प्रदूषण होत आहे. यासंदर्भात पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याशी चर्चा झाली आहे. त्यातून नक्कीच मार्ग निघणार आहे, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने खतना कॅम्प संपन्न

१३५ मुस्लिम बालकांचा सहभाग डॉ. उजेर बेग यांच्या हस्ते खतना

सोलापूर । प्रतिनिधी

मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही मुस्लिम समाजातील बालकांसाठी खतना शिबिराचे आयोजन करण्यात आले. यंदाच्या शिबिरात १३५ बालकांनी सहभाग घेतला असून, सोलापूरचे प्रसिद्ध खतना तज्ज्ञ डॉ. उजेर बेग यांच्या हस्ते खतना करण्यात आली. ही माहिती परिषद अध्यक्ष फारुक जमादार यांनी दिली.



शिबिराची सुरुवात कुराण पठण व प्रार्थनेने करण्यात आली. यावेळी मौलाना मोहसीन शेख, मौलाना सिकंदर मुलाणी, बकशभाई शेख, अल्लाउद्दीन शेख, मोहसीन नालबंद, जमीर मुलाणी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, हाजी हमीद सय्यद, अहमद बागवान आदी मान्यवर उपस्थित होते. मौलाना मोहसीन शेख यांनी खतनाचे धार्मिक महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, या उपक्रमामुळे समाजातील गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळतो. अशा शिबिरांची सातत्याने गरज आहे.शिबिरास नगरसेवक संजय (पप्पू) भगवान सावंत, मंडळ अधिकारी युसुफ बागवान, अशपाक सय्यद, हाजी नादीर नालबंद, हाजी कदीरभाई शेख आदींनी भेट दिली.या कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी चाँद हाजी फारुक बेग, अकीब सय्यद, फिरोज बेग, साहील शेख, शाहरुख शेख, आफताब पठाण, अरबाज बेग, नदीम शेख, नवाज बेग, जिशान शेख, शाहिद बेग, जमीन सय्यद, समीर दाऊद शेख, जाहीद शेख, हुजेफ कलंदर शेख, हुजेफ जावेद शेख यांनी विशेष मेहनत घेतली.

देशाच्या प्रगतीमध्ये कामगारांचे मोठे योगदान : छोटूभाई

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त वरोऱ्यात विविध उपक्रम संपन्न

वरोरा । प्रतिनिधी

देशाच्या प्रगतीमध्ये कामगारांचे योगदान मोलाचे असून, त्यांच्या आर्थिक शोषणाला आळा घालून शासनाच्या विविध योजनांचा थेट लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन काँग्रेस कामगार व कर्मचारी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा वरोऱ्याचे माजी सभापती शेख जैरुद्दीन उर्फ 'छोटूभाई' यांनी केले.



१ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त वरोरा येथील कामगार चौकात आयोजित कार्यक्रमात कामगार चौकातील फलकाला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. यानंतर उपस्थित महिला व पुरुष कामगारांना पुष्पगुच्छ व मिठाई वाटप करून दिनाचा सन्मानपूर्वक उत्सव साजरा करण्यात आला.कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष गजाननराव मेश्राम, ज्येष्ठ नागरिक संघाचे मारोतराव मगरे, कांबळे , दशरथ शेंडे तसेच अनेक मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते. कामगार चौकाला काही वर्षांपूर्वी अधिकृत मान्यता मिळाल्यानंतर सातत्याने या ठिकाणी कामगारांचे सन्मानाचे कार्यक्रम होत असून, छोटूभाई यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम अधिक परिणामकारक झाला आहे.छोटूभाई यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले की, कामगारांचे हक्क निश्चित व्हावेत यासाठी प्रशासनाने अधिकृत नोंदणी प्रक्रिया पारदर्शकपणे करावी. बोगस नोंदणीवर कारवाई केली पाहिजे आणि प्रत्येक कामगाराला नियमानुसार वेतन, मानधन व इतर सुविधा मिळाल्या पाहिजेत.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शेषराव भोयर, शब्बीर शेख, अनिकेत ठेंगणे, शंकर आत्राम, बावणे यांच्या सहकार्याने पार पडले. कामगारांनीही छोटूभाई यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांचे आभार मानले.

शिवसेनेकडून सफाई कामगारांचा गौरव

श्रमिकांचा सन्मान हीच खरी महाराष्ट्राची ओळख-सचिन डाखोरे

नागपूर । प्रतिनिधी

श्रमिकांचा सन्मान हीच खरी महाराष्ट्राची ओळख असून या भूमीचा खरा आधारवड म्हणजे कामगार वर्ग, असे उद्गार शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे विदर्भ प्रमुख सचिन डाखोरे यांनी व्यक्त केले. १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या निमित्ताने उत्तर नागपूर येथील बिनाकी पॉवर हाऊस परिसरात बीव्हीजी कंपनीच्या सफाई कामगारांचा सन्मान करताना ते बोलत होते.



या विशेष उपक्रमात शिवसेनेच्यावतीने सफाई कामगारांना भगवा दुपट्टा, गुलाबाचे फूल व मिठाई देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामध्ये कामगारांच्या अथक परिश्रमांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.सचिन डाखोरे म्हणाले, हीच ती श्रमसंस्कृती जी महाराष्ट्राला इतर राज्यांपेक्षा वेगळी ओळख देते. हे कामगार दिवसरात्र मेहनत घेतात, त्यांच्या कार्याशिवाय शहराची शिस्त, स्वच्छता व आरोग्य याची कल्पनाही करू शकत नाही.कार्यक्रमास शिवसेना विभागप्रमुख आशिष नाकाडे, सागर मौंदेकर, धीरज काटे, विकास मोरघडे, जनार्दन भगत, धनंजय टाकळीकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.या उपक्रमातून शिवसेनेने श्रमिकांच्या सन्मानासाठी सकारात्मक पाऊल उचलत सामाजिक बांधिलकी जपली असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुक्त विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ.धनंजय वेळूकर यांची भद्रावती अभ्यास केंद्रास भेट

भद्रावती । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा लवकरच सुरू होत आहे. त्या सुरळीत पार पडाव्यात या पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्रांवरील सोयी सुविधांचे परीक्षण करण्याकरिता व अभ्यास केंद्र अवलोकनार्थ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत येणाऱ्या नागपूर येथील विभागीय केंद्राचे वरिष्ठ संचालक डॉ. धनंजय वेळूकर यांनी स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यास केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी विवेकानंद महाविद्यालयातील (४२२७-) अभ्यास केंद्रावरील सर्व सोयीसुविधांची पाहणी केली. निरीक्षण करून उपलब्ध सोयीसुविधांबाबत समाधान व्यक्त केले. विशेषतः महाविद्यालयातील स्वच्छता व अभ्यास केंद्राचे कामकाज बघून शुभेच्छा व्यक्त केल्या.



यावेळी अभ्यास केंद्रावरील कर्मचाऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान त्यांच्या सोबत नागपूर विद्यापीठाचे मॅनेजमेंट कौन्सेलर डॉ.पांडुरंग डांगे उपस्थित होते. यावेळी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य तथा केंद्रप्रमुख डॉ. नामदेव उमाटे, उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. सुधीर आस्टुनकर, केंद्र संयोजक डॉ यशवंत घुमे, सहसंयोजक आशिष दुपारे, या अभ्यास केंद्राच्या माजी केंद्र संयोजक प्रा. संगीता बांबोडे व सेवक संजय तामगाडगे यांची उपस्थिती होती.

अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन निश्चित ; पर्यायी घरांची हमी

चंद्रपूर शहरातील रेल्वे अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनासाठी सकारात्मक पावले-आमदार सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपूर शहरातील रेल्वे अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनासाठी ठोस उपाययोजना करण्यात येत असून, यासंदर्भात आ.सुधीर मुनगंटीवार यांची केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे महत्त्वपूर्ण चर्चा झाली. शहरातील रेल्वे स्टेशन यार्ड, सावरकर नगर, रयतवारी आणि लखमापूर परिसरातील अतिक्रमणधारकांसाठी पर्यायी घरे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मध्य रेल्वेचे मुख्य महाप्रबंधक धर्म वीर मीना यांनाही पत्र पाठवून चंद्रपूर शहर व परिसरातील रेल्वे अतिक्रमणधारकांना पर्यायी घरे उपलब्ध करून देण्यासंदर्भात मुंबई येथे बैठक घेऊन चर्चा उपस्थित केली होती.चंद्रपूर शहरातील रेल्वे अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनासाठी सकारात्मक पावले उचलल्या जात असून अतिक्रमणधारकांना पर्यायी घरे उपलब्ध करून देण्यात येईल अशी ग्वाही, राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.



नियोजन भवन सभागृह येथे रेल्वे अतिक्रमणधारकांना पर्यायी घरे उपलब्ध करून देणे व इतर समस्या संदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, उपविभागिय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, रेल्वे विभागाचे सहाय्यक मंडळ अभियंता सुबोध कुमार, कार्यकारी अभियंता नवीन शर्मा, उपकार्यकारी अभियंता योगेंद्र कुमार तसेच नागरिकांची उपस्थिती होती. आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूर शहरात सध्या तिसरी रेल्वेलाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून, या प्रकल्पात सुमारे ६४० घरे बाधित होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली. मात्र, रेल्वे प्रशासनाने कोणतेही काम जबरदस्तीने न करता नागरिकांच्या सहकार्याने पार पाडावे, असे स्पष्ट निर्देश आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी रेल्वे प्रशासनाला दिले. या प्रकल्पादरम्यान बाधित होणाऱ्या ६८ घरांचे सर्वेक्षण करून, संबंधित नागरिकांशी बैठक घ्यावी. तसेच रेल्वे विभागाने अतिक्रमण हटविण्यापूर्वी पुनर्वसनाची ठोस व्यवस्था करावी. या पुनर्वसनासाठी म्हाडा येथील उपलब्ध घरांची पाहणी करण्यात येईल. महानगरपालिकेने रेल्वे लाईनमधून जाणाऱ्या नाल्यांची योग्यरीत्या स्वच्छता करावी. तसेच जिल्हा प्रशासनाने अतिक्रमित घरांची सविस्तर यादी तयार करावी. रेल्वे लाईनसाठी नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराने सीएसआर अंतर्गत स्थानिक विकासासाठी निधी खर्च करावा. दरम्यान, रेल्वे विभागामार्फत येत्या दोन महिन्यांत अतिक्रमित ६८ घरे हटविण्यात येणार असून, संबंधित नागरिकांना म्हाडामार्फत १०० घरे तातडीने उपलब्ध करून देण्यात येतील. पुढील दीड वर्षाच्या कालावधीत टप्प्याटप्याने एकूण ९०० घरे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येईल असेही ते म्हणाले.या संपूर्ण प्रक्रियेस गती देण्यासाठी लवकरच केंद्रीय रेल्वेमंत्री आणि मा. मुख्यमंत्री यांच्यासोबत झूमद्वारे उच्चस्तरीय बैठक घेण्यात येणार असल्याचेही आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले. सर्व नागरिकांना कठीण व मानसिक तणावाच्या परिस्थितीतून बाहेर काढल्याबद्दल नागरिकांनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे मनःपूर्वक आभार मानले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .